# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

दुरध्वनी क्र. 0253-2599310, ई-मेल : eebnnashik@rediffmail.com

जा.क्र. जिपना/ग्रापापुवि/तांशा/ ३००७ /२०१३ दिनांक: 30 DEC 2013

प्रति,
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर

विषय : बेलपाली, ता.त्र्यंबकेश्वर येथील पिण्याच्या पाण्याची योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरीत करण्याबाबत.

संदर्भ : व्यवस्थापक, एस.एन.एस.फाऊंडेशन, नाशिक यांचे दि.११/१२/२०१३ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये बेलपाली, ता.त्र्यंबकेश्वर येथे एस.एन.एस. फाऊंडेशन, नाशिक यांचेमार्फत गावातील विहीरीवर वीज कनेक्शन घेऊन, गावात पाण्याची टाकी बांधकाम करुन, पाईपलाईन, स्टँडपोस्ट इत्यादी कामे करुन पाणी पुरवठा सुरु केलेला होता. तथापि, वीज बील, देखभाल दुरुस्ती इत्यादींचा खर्च गावामार्फत होत नसल्याने सदर गावाचा पाणी पुरवठा बंद आहे. त्यामुळे स्थानिक लोकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. तसेच एस.एन.एस. फाऊंडेशन यांचेमार्फत सदर कामासाठी रु.३.०० लक्ष इतका निधी खर्च झालेला आहे. सदर देखभाल व दुरुस्तीचे काम गावामार्फत होत नसल्याने, सदर खर्च वाया जाणार आहे. तरी सदर योजनेतून पाणी पुरवठा सुरळीत होणेस्तव आपणामार्फत पाहणी करुन व सदर काम ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत होणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

आपले माहिती व कार्यवाहीसाठी.

सोबत : संदर्भ पत्राची प्रत

कार्यकारी अभियंता
ग्रा.पा.पु.विभाग, जि.प. नाशिक

प्रत : उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. उपविभाग, नाशिक यांचे माहिती व कार्यवाहीसाठी.
प्रत : व्यवस्थापक, एस.एन.एस. फाऊंडेशन, परफेक्ट सर्कल इंडीया लि., २० एम.आय.डी.सी. इस्टेट, सातपूर, नाशिक-४२२००७ यांचे माहितीस्तव.